# Weekly Marathi Vocab 01 to 06 April

**1. अखंड (विशेषण)**

**अर्थ:** ज्याला कधीही खंड पडला नाही असा



- **समानार्थी शब्द:** अंतहीन
- **विरुद्धार्थी शब्द:** खंड
- **वाक्यात उपयोग: अखंड** भारत हे अनेकांचे स्वप्न आहे.
- **विशेषण (व्याख्या):** नामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला विशेषण असे म्हणतात.
- **नाम (व्याख्या):** विश्वातील कोणत्याही घटकाला ओळखण्यासाठी वापरण्यात येणारा शब्द म्हणजे नाम होय.

**2. शृंग**

**अर्थ;** एखाद्या वस्तूचा सर्वोच्च बिंदू



- **समानार्थी शब्द:** डोके, शिखर
- **विरुद्धार्थी शब्द:** तळ, पाया
- **वाक्यात उपयोग:** सह्याद्रीचे सर्वोच्च **शृंग** कळसुबाई आहे.

**3. आस्तिक**

**अर्थ;** देव आहे असे मानणारा



- **विरुद्धार्थी शब्द:** नास्तिक
- **वाक्यात उपयोग:** रामराव हे मोठे **आस्तिक** मनुष्य आहेत.

**4. कृत्रिम (विशेषण)**
**अर्थ:** नैसर्गिक नसलेला, बनावटी



- **समानार्थी शब्द:** अनैसर्गिक
- **विरुद्धार्थी शब्द:** नैसर्गिक
- **वाक्यात उपयोग: कृत्रिम** बुद्धिमत्तेमुळे नोकऱ्यांचे प्रमाण कमी होत आहे.
- **विशेषण (व्याख्या):** नामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला विशेषण असे म्हणतात.

**5. वात्रट (विशेषण)**
**अर्थ;** खूप खोड्या करणारा



- **समानार्थी शब्द:** खोडकर, दुर्गुणी
- **विरुद्धार्थी शब्द:** सद्गुणी
- **वाक्यात उपयोग:** रमेश हा एक **वात्रट** मुलगा आहे.

**6. अनुपस्थित**

**अर्थ;** हजर नसलेला

- **समानार्थी शब्द:** गैरहजर
- **विरुद्धार्थी शब्द:** हजर, उपस्थित
- **वाक्यात उपयोग:** अक्षय परीक्षेला **अनुपस्थित** होता.

**7. अनुचित**

**अर्थ:** उचित नसलेले



- **समानार्थी शब्द:** अयोग्य
- **विरुद्धार्थी शब्द:** योग्य, उचित
- **वाक्यात उपयोग:** आजकाल स्पर्धा परीक्षांमध्ये **अनुचित** प्रकार घडत आहेत.

**8. अनुराग**

**अर्थ;** प्रेम



- **समानार्थी शब्द:** वात्सल्य, माया
- **विरुद्धार्थी शब्द:** द्वेष, मत्सर
- **वाक्यात उपयोग: अनुराग** ही खूप महत्त्वाची भावना आहे.

**9. बिकट**

**अर्थ;** सहज सोपे नसलेले



- **समानार्थी शब्द:** अवघड, कठीण
- **विरुद्धार्थी शब्द:** सोपे, सुलभ
- **वाक्यात उपयोग:** माणसाला बिकट परिस्थितीला सामोरे गेले पाहिजे.

**10. निर्भर्स्तना**

**अर्थ:** एखाद्या विषयी वाईट बोलणे



- **समानार्थी शब्द:** निंदा
- **विरुद्धार्थी शब्द:** स्तुती
- **वाक्यात उपयोग:** एखाद्याच्या मागे त्याची **निर्भर्त्सना** करणे चुकीचे आहे.

**11. ऱ्हास**

**अर्थ;** अधोगती होणे

- **समानार्थी शब्द:** अधोगती, नुकसान
- **विरुद्धार्थी शब्द:** प्रगती, विकास
- **वाक्यात उपयोग:** प्रदूषणामुळे पर्यावरणाचा **ऱ्हास** होत आहे.

**12. क्षणिक**

**अर्थ;** अल्प कालावधी टिकणारे

- **समानार्थी शब्द:** अल्पायु
- **विरुद्धार्थी शब्द:** चिरकाळ, दीर्घायू
- **वाक्यात उपयोग:** सौंदर्यावरचे प्रेम हे **क्षणिक** असते.

**13. निद्रिस्त**

**अर्थ:** निद्रा अवस्थेत असलेला



- **समानार्थी शब्द:** झोपेत असलेला
- **विरुद्धार्थी शब्द:** जागृत
- **वाक्यात उपयोग: निद्रिस्त** अवस्थेत वाहन चालवणे हानिकारक आहे.

**14. तीक्ष्ण**

**अर्थ;** तेज धार असलेला



- **समानार्थी शब्द:** धारदार
- **विरुद्धार्थी शब्द:** बोथट
- **वाक्यात उपयोग:** त्याने **तीक्ष्ण** हत्याराने वार केला.

**15. दर्जेदार**

**अर्थ;** उत्कृष्ट दर्जाचे



- **विरुद्धार्थी शब्द:** हीन
- **वाक्यात उपयोग:** काही कंपन्या आपल्या ग्राहकांना **दर्जेदार** उत्पादन देदैनिक मराठी व्होकॅबतात.

**16. मंजुळ**

**अर्थ:** सुरेख आवाज



- **विरुद्धार्थी शब्द:** कर्कश
- **वाक्यात उपयोग:** रोज सकाळी मधु कोकिळेचा **मंजुळ**आवाज ऐकून उठत असे.

**17. नम्रता**

**अर्थ;** नम्र पणे वागणे



- **समानार्थी शब्द:** विनम्र
- **विरुद्धार्थी शब्द:** उद्धटपणा
- **वाक्यात उपयोग:** सर्वांशी **नम्रतेने** वागले पाहिजे.

**18. आवक**

**अर्थ;** येणारे



- **विरुद्धार्थी शब्द:** जावक
- **वाक्यात उपयोग:** बाजारात नकली वस्तूंची आवक वाढली आहे.